ही अशी एक प्रार्थना आहे की आम्हा सर्वांना ती करायलाच पाहिजे. आम्ही प्रत्येक वेळेस देवाजवळ मागतो की, आमचे आरोग्य चांगले ठेव, किंवा आमचे धन वाढव किंवा आमचे जीवन वाढव, पण किती वेळेस आम्ही प्रार्थना करतो, "प्रभू आमचा विश्वास वाढव?" ह्या विषयावर आम्हाला गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

पहिली गोष्ट ह्या ठिकाणी आम्ही पाहतो की, प्रेषितांना त्यांच्या विश्वासामध्ये संतुष्टी वाटत नव्हती. एक वेळेस जेव्हा प्रभू येशू नावेमध्ये बसून आपल्या शिष्यांसोबत जात असतांना आम्ही वाचतो की अचानक समुद्रामध्ये वादळ उठले होते आणि त्याचे शिष्य अत्यंत भयभीत झाले होते. परंतु मत्तय ८:२६ मध्ये येशूने त्यांना म्हटले होते "अहो अल्पविश्वासी तुम्ही का घाबरला?" प्रेषितांविषयी आम्ही वाचतो की, त्यांचा विश्वास अनेक वेळेस डळमळीत असा होत होता. तरी पण ते आपले धैर्य सोडत नव्हते. परंतु आम्ही अविश्वासामुळे पुष्कळ वेळेस आपले धैर्य सोडून देतो. पण मी ह्या ठिकाणी तुम्हाला सांगू इच्छितो की, जर तुम्ही परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्यासाठी कोणते कार्य करीत असाल तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल जरी जे काम पूर्ण नाही झाले तरीही. परमेश्वराजवळ आमचे यश परिणामावर अवलंबून राहाते की आम्ही किती परिश्रम आणि प्रयत्न केला होता आणि ह्यामुळेच आम्ही तारण मिळण्याची आशा धरू शकतो. परंतु असे झाले नसते तर आम्ही तारण कसे मिळवू शकलो असतो. पण ह्या ठिकाणी आम्ही पाहतो की, आपल्या विश्वासामध्ये असंतुष्ट होवून प्रेषितांनी आपला विश्वास सुधारण्याचा प्रयत्न केला होता. पौलाविषयी आम्ही वाचतो की, फिलीपै ३: १३-१४ मध्ये तो म्हणतो की, "बंधूजनहो, मी अद्यापि ते आपल्या कह्यांत आणले असे मानीत नाही, तर मागील गोष्टीकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो, हेच एक माझे काम आहे."

दुसरी गोष्ट ही आहे की, आम्हाला आमच्या विश्वास वाढविण्याची फारच मोठी आवश्यकता आहे. ख्रिस्ती धर्म हा विश्वासाचा धर्म आहे आणि एक जिंवत काम करणारे आणि परिपूर्ण विश्वासाविना कोणीही मनुष्य तारण प्राप्त करू शकणार नाही. इब्री ११:६ मध्ये लिहिले आहे "आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे, कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास धरिला पाहिजे की तो आहे, आणि त्याजकडे धाव घेणाऱ्याला तो प्रतिफळ देणारा होतो."

नंतर, विश्वासाने आम्ही जिवंत राहातो. पौल २ करिंथ ५:७ मध्ये म्हणतो की, 'आम्ही विश्वासाने चालतो, डोळ्यांनी दिसते त्याप्रमाणे चालत नाही." प्रत्येक दिवशी सैतान आमच्यासमोर निरनिराळ्या प्रकारचे लालच आणि परीक्षा घेवून येतो आणि त्याला सामोरे जाण्यासाठी आम्हाला एक फार मोठया आणि मजबूत विश्वासाची गरज आहे. म्हणून योहान म्हणतो की, १ ले योहान ५:४ मध्ये ".... ज्याने जगावर जय मिळविला तो हाच आपला विश्वास आहे."

तिसरी गोष्ट ही आहे की, आता आपण अशा काही गोष्टीवर विचार करू की जे आमच्या विश्वासाला वाढविण्यासाठी आवश्यक आहेत. विश्वास वाढविण्यासाठी तीन बाबीं ह्या प्रकारे आहेत. पहिली, आपल्या आंतमध्ये इच्छा असायला पाहिजे. ह्याशिवाय दुसऱ्या दोन बाबी व्यर्थ होवून जातील.

दुसरी, आम्हाला पवित्रशास्त्र, जे विश्वासाचे उगम आहे, ते वाचायला पाहिजे. पौल रोम १०:१७ मध्ये म्हणतो की, 'याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाने होते." तिसरी, आम्हाला आमच्या विश्वासाला कार्यामध्ये आणायला पाहिजे, अन्यथा पहिल्या दोन्हीही बाबी व्यर्थ होऊन जातील. आम्हाला ही आठवण ठेवायला पाहिजे की प्रार्थना करून आम्हाला मोकळे व्हायला नको. याचा अर्थ, जर आम्ही आमच्या आरोग्यासाठी प्रार्थना करत आहोत तर आम्हाला आमच्या शरीराकडे सुद्धा लक्ष ठेवायला पाहिजे. ह्याचप्रमाणे, जर आम्ही

पापामध्ये हरवलेल्यासाठी प्रार्थना करीत असू तर आम्हाला त्यांना ख्रिस्ताची सुवार्ता सुद्धा सांगायला पाहिजे. आम्हाला आठवण ठेवायला पाहिजे की, निसर्गाचा असा नियम आहे आणि आत्मिक गोष्टीमध्ये सुद्धा हाच सिद्धांत लागू पडतो, जर एखाद्या वस्तुला आम्ही थोड्या प्रमाणात उपयोगात आणले तर त्याचा थोडाच उपयोग आम्ही करू शकतो. पण जितक्या अधिक प्रमाणात कोणत्या वस्तुचा आम्ही उपयोग करतो, तर तेवढाच अधिक त्याचा उपयोग पण होतो. कोणत्या प्रकारचा तुमचा विश्वास आहे ? काय त्याचा उपयोग न होण्याने तो मृत आहे, किंवा जीवंत व मजबूत आहे ? आम्हाला आठवण ठेवायला पाहिजे की येशूने इफिसच्या मंडळीला प्रकटी २:१०मध्ये म्हटले आहे की, "..... तुला मरावे लागले तरी विश्वासू राहा, म्हणजे मी तुला जीवनी मुगूट देईन."

आमच्या प्रिय वाचकांनो, आम्ही सदैव तुम्हा सर्वांसाठी प्रार्थना करीत असतो. जर ह्या पहिल्या त्रैमासिकाद्वारे तुम्हाला आत्मिक लाभ मिळाला असेल तर आम्हाला जरूर कळवा. आपल्या प्रभू येशूची कृपा तुम्हावर सदैव असो.

ooo

फिलीपै ३: १३-१४ मध्ये तो म्हणतो की, "बंधूजनहो, मी अद्यापि ते आपल्या कह्यांत आणले असे मानीत नाही, तर मागील गोष्टीकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो, हेच एक माझे काम आहे."

आम्हां शब्दश: शारीरिक अंत:करणाबद्दल सांगत नाही; परंतु तो जो भाग आपल्या भावनेचा, आपल्या खात्रीपणाचा केंद्रबिंदू आहे जो की आपल्या कृतीला आणि विचारांना नियंत्रित करतो.

**विश्वासाविषयक पवित्रशास्त्रातील काही मूलभूत माहिती :**

आपल्यासाठी विश्वासाची व्याख्या इब्री ११:१ प्रमाणे केली आहे. "विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टीविषयींचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खात्री आहे." आपण पाहतो की, विश्वास वाढविणे आणि टिकविणे ही मूलभूत मानसिक क्रिया आहे. आपल्या कृतींच्याद्वारे विश्वासाचा परिणाम दिसतो. नाही का ? आपल्यासोबत ह्या काही गोष्टी घडत असतात. रोम १० : १७ आपल्याला सांगते की, "ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्याद्वारे होते." आपण काही गोष्टी वाचतो किंवा ऐकतो त्याला आपण मानसिकरित्या सहमत होतो किंवा स्विकारण्याला कारणीभूत होतो. तारणदायी विश्वास होण्यापूर्वी हा विश्वास पूर्णपणे वाढला पाहिजे. आपल्याला माहित आहे की आपल्या मनात अशा अनेक गोष्टी आहेत की ज्यावर आपण कोणीतीही कृती केलेली नाही. कारण आपण त्यावर खऱ्या रितीने विश्वास ठेवला नाही.

पौल २ करिंथ १३:५ मध्ये सांगतो की, "तुम्ही विश्वासात आहा किंवा नाही ह्याविषयी आपली परीक्षा करा..." आपण विचार करतो की आपण विश्वासात आहोत पण तरीसुद्धा खऱ्या रितीने विश्वासात नसतो. ह्यासाठी तो सावध करतो.

१ करिंथ १६:१३ मध्ये पौल विनंती करतो की, "सावध असा, विश्वासात स्थिर राहा, मर्दासारखे वागा, खंबीर व्हा." त्याचा सातत्याचा संदेश हा आहे की, आपल्याला विश्वास (भरवसा) आपल्या डोक्यात (मनात) असू शकतो की तो कधीच आपल्या अंत:करणात खाली खेचल्या जात नाही.

**विश्वास - ज्यावर तारण रचल्या गेले आहे तो पाया.**

येशूने म्हटले, "जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल." (मार्क १६:१६). तारणाऱ्याने योहानकृत शुभवर्तमानामध्ये म्हटले, "... कारण मी तो आहे असा विश्वास तुम्ही न धरल्यास तुम्ही आपल्या पापात मराल." आम्ही इब्री ११:६ पासून शिकतो की, ".... विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की,तो आहे आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे." हे खरे आहे की जे प्रभूचा शोध झटून घेतात त्यांना फक्त बुद्धीची खात्रीच हवी असे नाही, तर विश्वासाची खात्री जी की अंत:करणातून निर्माण होते ती पाहिजे. **प्रथम बुद्धीचा विश्वास येतो आणि नंतर अंत:करणाचा विश्वास येतो.**

योहानकृत शुभवर्तमानाच्या वृत्तांचा मुख्य मुद्दा योहान २०:१३ मध्ये विशेषत: प्रदर्शित होतो. "येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा आणि विश्वास ठेवून तुम्हाला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे, म्हणून ही लिहिली आहेत." तो ह्या वचनामध्ये कोणत्या प्रकारच्या विश्वासाबद्दल बोलत आहे. बुद्धीचा विश्वास किंवा अंत:करणाचा विश्वास ? जर ह्या विश्वासाच्या प्रकाराचा परिणाम "त्याच्या नावाने जीवन" (तारण) आहे तर नक्कीच हा अंत:करणाचा विश्वास आहे.

बुद्धीचा विश्वास आणि अंत:करणाचा विश्वासाचे उद्राहरण

"असे असूनही अधिकाऱ्यातून देखील पुष्कळ जणांनी त्याच्यावर विश्वास ठेवला; परंतु आपण सभाबहिष्कृत होऊ नये म्हणून परूश्यांमुळे ते तसे कबूल करीत नव्हते; कारण त्यांना देवाकडील गौरवापेक्षा मानवाकडील गौरव अधिक प्रिय वाटले." (योहान १२: ४२,४३) ह्या अधिकाऱ्यांचा कोणत्या प्रकारचा विश्वास होता?

बुद्धीचा किंवा अंत:करणाचा ?

रोम १० :९, १० म्हणते, "... येशू प्रभू आहे असे जर 'तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यातून उठविले असा 'आपल्या अंत:करणात' विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल; कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नितिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते. मी तुम्हाला विचारतो हा बुद्धीचा विश्वास किंवा अंत:करणाचा विश्वास आहे ?

हे खरे आहे की पवित्रशास्त्रातील काही भाग समजण्यासाठी सोपे नाही; परंतु पवित्रशास्त्र बुद्धीचा विश्वास किंवा अंत:करणाचा विश्वासाबद्दल बोलते तेव्हा ते माहीत होण्यासाठी एवढेही कठीण नाही. बुद्धीचा विश्वास मूलभूतरित्या निष्क्रिय आहे. पवित्रशास्त्र देवाबद्दल आणि ख्रिस्ताबद्दल जे काही सांगते त्याला आपण चांगल्या प्रकारे समजले आणि स्विकारले पण कृतीमध्ये विश्वास ठेवला नाही. त्याचप्रमाणे जसा यहुदी अधिकाऱ्यांनी ठेवला नाही.

तुम्हाला खरोखर विश्वास आहे का की देवाला तुमचा विश्वास अंत:करणातून आहे याची खात्री आहे?

रोम ६:१७ मध्ये पौल आनंदित होतो की ज्या ख्रिस्त लोकांनी "पालन मनापासून केले..." ज्यांनी मनापासून आज्ञा पाळली आणि सर्वदा अंत:करणपूर्वक सेवा केली त्यांना येशूने म्हटलेल्या शब्दाबद्दल घाबरण्याचे कारण नाही की जे त्याने मत्तय ७:२१ मध्ये म्हटले, 'मला प्रभुजी, प्रभुजी, असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल."

तुमच्या विश्वासाबद्दल काय? गंभीर परीक्षण असे दाखविते की हे अंत:करणातून आहे किंवा फक्त बुद्धीतूनच आहे?

ooo

पावत नाही. परंतु तो केवळ एकदाच मृत्यू पावतो. पण मृत्यू काय आहे ?

पवित्र शास्त्रात जीवनाप्रमाणेच मृत्यूला देखील तीन वेगवेगळ्या दृष्टिकोनांमधून मांडले आहे. जीवनाविषयी पवित्र शास्त्र आम्हास सांगते की, मनुष्याचे एक शारीरिक, एक आत्मिक व तिसरे अनंत जीवन आहे. अशाचप्रमारे मृत्यूविषयी पवित्र शास्त्रामध्ये आम्हास आढळते की एक मनुष्याचे शारीरिक मरण आहे, दुसरे आत्मिक मरण व तिसरे अनंतकालीक मरण आहे.

शारीरिक मरणाचा संबंध मनुष्यांच्या शरीराशी आहे. हे मरण तेव्हा येते जेव्हा मनुष्याचा आत्मा शरीरापासून वेगळा होतो. पवित्र शास्त्रात आपण एका ठिकाणी असं वाचतो, "जसे शरीर आत्म्यावाचून निर्जिव आहे, तसा विश्वासही क्रियांवाचून निर्जीव आहे." (याकोब २ : २५) म्हणून जेव्हा आत्मा देहापासून वेगळा होतो तेव्हा त्याचा परिणाम शारीरिक मृत्यू होतो. हे मरण विश्वव्यापी आहे, प्रत्येकासाठी आहे. ह्या मृत्यूला प्रत्येकाला सामोरं जावं लागते कारण परमेश्वराने जिवंत असणाऱ्या प्रत्येकासाठी ह्या मृत्यूला नेमले आहे. शारीरिक मरण न केवळ अद्यार्मिकां करिता परंतु धार्मिकांसाठी सुद्धा आहे. फक्त पाप करणारेच ह्या मरणास सामोरे जातात असे नाही परंतु कधीच पाप न केलेले लहान लहान बालकं देखील ह्या मृत्यूचे शिकार ठरतात.

जसा शारीरिक मृत्यू विना भेदभाव केल्याचा सगळ्यांसाठी असतो परंतु आत्मिक मृत्यू मात्र तसा नसून आत्मीक मरण हे केवळ पापामुळेच मिळते. परंतु आत्मिक मरणाविषयी अशी समजूत करून घेणं चुक ठरेल की ह्यामुळे आत्म्याचं अस्तित्वच नष्ट होऊन जाते. परंतु आत्मिक मरणाचा अर्थ आहे मनुष्याचे परमेश्वरापासून म्हणजे आत्मिक जीवनाच्या स्त्रोतापासून वेगळे होणे. ह्या मृत्यूविषयी पहिले उदाहरण आपल्याला पवित्र शास्त्रात आदाम आणि हवा असे मनुष्य होते, ज्यांना परमेश्वराने पृथ्वीवर राहण्यासाठी अद्भूत रितीने सर्वात आधी बनविले, त्यावेळी

परमेश्वराने त्यांना अशा ठिकाणी ठेवले होते जेथे त्यांना शारीरिक आणि आत्मिक दोन्ही प्रकारचे आशीर्वाद प्राप्त होते. तेथे त्यांना कोणतेही भय नव्हते किंवा कशाचीही उणीव, कमतरता नव्हती आणि सगळ्यात मोठी गोष्ट ही की त्यांना परमेश्वराची संगती प्राप्त होती. परमेश्वराने मनुष्याला आपल्याच समान बनविले असल्याने हे दोघे परमेश्वरा समानच स्वतंत्र होते. म्हणजेच परमेश्वराने मनुष्याला बांधून ठेवले नव्हते. परंतु त्याला सर्व तऱ्हेची स्वतंत्रता दिलेली होती. पण आदाम आणि हवेला परमेश्वर म्हणाला होता, की ज्या दिवशी तुम्ही माझे नियम तोडाल त्या दिवशी तुम्ही मराल आणि पवित्र शास्त्रात पुढे आपण वाचतो की थोड्याच कालावधीत परमेश्वराने दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरूपयोग करून त्यांनी परमेश्वराचे नियम तोडले. ह्याचबरोबर परमेश्वराचे वचनही पूर्ण झाले ते म्हणजे "ज्या दिवशी तुम्ही माझे नियम तोडाल त्या दिवशी तुम्ही खास मराल." परमेश्वराने तेव्हा मनुष्याला आपल्या संगतीतून दूर केले अशाप्रकारे त्या दिवशी मनुष्य आत्मिक रितीने मरण पावला.

पवित्र शास्त्रात एका ठिकाणी अशा प्रकारे लिहिलेले आपणास आढळते, "तर प्रत्येक मनुष्य आपल्या वासनेने ओढलेला व भुलविलेला असा मोहांत पडतो मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते, आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते."(याकोब १:१४-१५)

अशाप्रकारे वरील वचनानुसार मनुष्याच्या आत्मिक मरणास त्याचे स्वत:चे पाप कारणीभूत असते. पवित्र शास्त्रानुसार येहेज्केलमध्ये आपण पहातो, "जो जीवात्मा पाप करील तोच मरेल, मुलगा बापाच्या पातकाचा भार वाहणार नाही, आणि बाप मुलग्याच्या पातकाचा भार वाहणार नाही, धार्मिकाला त्याच्या धार्मिकतेचे फळ मिळेल, दुष्टाला त्याच्या दुष्टतेचे फळ मिळेल." (येहेज्केल १८ : २०)

अशा प्रकारे एका ठिकाणी असे लिहिलेले आपण पाहतो, "तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव यांच्यामध्ये आडभिंती प्रमाणे झाले आहेत, तुमच्या पातकांमुळे तो तुम्हास दर्शन देत नाही, तुमचे ऐकत

नाही." (यशया ५९:२)

जरी आदामाच्या पापामध्ये पडण्याने सर्व मनुष्यांमध्ये शारीरिक मृत्यू आला तरीदेखील आत्मिक मृत्यूचे कारण प्रत्येक मनुष्याचे स्वत:चे पाप असतात आणि पवित्रशास्त्र आम्हास हे देखील सांगते, "कारण सर्वांनी पाप केले आहे आणि देवाच्या गौरवाला ते अंतरले आहेत." (रोम ३ : २३)

यास्तव पृथ्वीवर प्रत्येक मनुष्य जो परमेश्वरासमोर दोषी आहे तो आत्मिदृष्ट्या मृत्यू पावलेला आहे.

पण आत्मिक मृत्यू म्हणजे अनंत कालीक मृत्यू नव्हे. कारण आत्मिक मरण व अनंतकालिक सार्वकालीन मरण ह्यामध्ये फार मोठा फरक आहे. आत्मिक मृत्यूमुळे प्रत्येक मनुष्य हा आपल्याच पापामुळे आत्मिकदृष्ट्या मरण पावलेला आहे म्हणजे देवाच्या सहवासापासून दुरावलेला आहे परंतु पवित्र शास्त्र आम्हास सांगते की परमेश्वराच्या सामर्थ्याने आपण ह्या मृत्यूपासून स्वत:ची सुटका करून घेऊ शकतो. पण सार्वकालीन मरणापासून कोणीही स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही कारण ते सर्वकाळासाठी असते. परंतु ह्या मृत्यूपासून वाचण्यासाठी आधी आपणास आत्मिक मृत्यूपासून स्वत:स वाचवावे लागेल. कारण आत्मिक मरणचं मनुष्याला सार्वकालिक मृत्यूकडे घेऊन जाते. ज्याप्रकारे आत्मिक मृत्यू म्हणजे परमेश्वरापासून दुरावणे त्याचप्रमारे सार्वकालीक मृत्यू म्हणजे परमेश्वरापासून अनंतकाळाकरिता दुरावणे, विलग होते पण सार्वकालीक मृत्यूचा संबंध ह्या जगाशी लावता येत नाही. कारण जोपर्यंत मनुष्य ज्या जगामध्ये असतो आत्मिक मरणापासून स्वत:ची सुटका करून धेण्याची संधी त्याला परमेश्वराने दिलेली आहे. ह्यामुळे जो मनुष्य आत्मिक मरणापासून स्वत:स वाचवितो तो सार्वकालिक मृत्यूपासूनही स्वत:ची सुटका करून घेतो. प्रभू येशू ख्रिस्त त्याच्या वचनाद्वारे म्हणतो, "मी तुम्हास खचित खचित सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्यावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन

प्राप्त झाले आहे आणि त्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणांतून जीवनात पार गेला आहे." (योहान ५ : २४)

परंतु आत्मिक मृत्यूपासून पार होवून जीवनात प्रवेश करण्याची संधी मनुष्याजवळ तो ह्या जगामध्ये असेपर्यंत आहे कारण शारीरिक मृत्यू प्राप्त होवून ह्या जगामधून निघून गेल्यावर त्याच्याजवळ कुठलीही संधी नसते. ह्यामुळे ह्या जगात असताना जो आत्मिक मरणापासून स्वत:ची सुटका करून घेतो तोच केवळ ह्या सार्वकालिक मृत्यूपासून वाचू शकतो. अन्यथा आत्मिक दृष्ट्या मरण पावलेला प्रत्येक व्यक्ती शारीरिक मरणानंतर सार्वकालिक मरणासाठी राखून ठेवलेला असतो. म्हणून पवित्र शास्त्र आम्हाला सांगते, "प्रभुमध्ये मरणारे आतापासून धन्य आहेत. आत्मा म्हणतो, खरेच आपल्या कष्टांपासून त्यास विसावा मिळेल, त्यांची कृत्ये त्याचबरोबर जातात." (प्रकटी १४ : १३)

येथे एक गोष्ट लक्षात घेणे अतिशय आवश्यक आहे ती म्हणजे ज्याप्रमाणे सार्वकालीक मरणाचा अर्थ परमेश्वरापासून दूर होऊन नर्कात जाणे, त्याचप्रमाणे सार्वकालिक जीवन म्हणजे नेहमीसाठी परमेश्वरासोबत त्याच्या संगतीमध्ये रहाणे.

मनुष्य आपल्या पापापासून कशी सुटका करून घेऊ शकेल ? ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे प्रभू येशू ख्रिस्ताद्वारेच, कारण पवित्र शास्त्रात असे लिहिलेले आहे की, " येशू ख्रिस्तचं आपल्या पापाबद्दल प्रायश्चित्त आहे (१ ले योहान २ : २) त्याला परमेश्वराने स्वत:च्या इच्छेनेच ह्या जगामध्ये पाठविले आणि क्रुसावर त्याला पापासाठी बलिदान करून आपल्या सुटकेसाठी त्याला क्रुसावर मरण पत्करावं लागलं. पवित्र शास्त्र आम्हास सांगते, की जेव्हा आम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो आणि त्याला स्वत:मध्ये धारण करून त्याच्या नावामध्ये बाप्तिस्मा घेतो तेव्हा त्याने आमच्यासाठी केलेल्या बलिदानामुळे परमेश्वर आमच्या सर्व पापाची क्षमा करून आमचा उद्धार करतो." (मार्क १६ : १६, गलती ३

: २७, प्रेषित १७ : ३०, ३१)

"जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी आहे तर तो नवी उत्पत्ती आहे, जुने ते होऊन गेले, पाहा ते नवे झाले आहे. हे सर्व देवापासून आहे. त्याने आपणाबरोबर तुमचा समेट ख्रिस्ताच्या द्वारे केला, आणि समेटाची सेवा आम्हास दिली, म्हणजे जगातील लोकांची पातके त्याजकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये आपणाबरोबर जगाचा समेट करीत होता, आणि त्याने आम्हांकडे समेटाचे वचन सोपवून दिले. यास्तव देव आम्हांकडून बोध करवीत असल्यासारखे आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकिली करितो. देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हावे अशी ख्रिस्ताच्या वतीने आम्ही विनंती करतो. ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले, यासाठी की आपण त्याच्याठायी देवाचे नितीमत्व असे व्हावे." (२ रे करिंथ ५ : १७ - २१)

म्हणून मित्रांनो, परमेश्वर किती महान आणि दयाळू आहे, त्याच्या पवित्रतेने मनुष्यास त्यापासून वेगळे केले होते परंतु त्याच्या प्रेमाने मनुष्यास परत त्याजकडे त्याच्याजवळ असे केले. जे लोक परमेश्वरावर प्रेम करतात त्याच्या इच्छेनुसार चालतात, ज्यांनी प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे मिळणाऱ्या सुटकेस प्राप्त करून घेतले आहे, ते आत्मिक मृत्यूपासून सुटले आहेत आणि शारीरिक मृत्यू हे त्यांच्या करिता केवळ एक साधन आहे. जे त्यांना परमेश्वराच्या संगतीत सर्व काळासाठी राहण्यास कारणीभूत आहे.

आशा आहे, ह्या सर्व गोष्टींवर आपण गंभीरपणे विचार कराल आणि अनंत जीवनात प्रवेश करण्यासाठी निश्चय करून आतापासूनच स्वत:ची आत्मिक तयारी सुरू कराल. धन्यवाद !

ooo

त्याने तेथे सेवा केली.

वृद्ध असताना आणि त्याने स्वत:चा नावलौकिक मिळवला असताना देखील आणि मेदी व पारसी ह्यांच्या साम्राज्यात एक मुख्य प्रशासक म्हणून त्याची निवड झालेली असताना देखील दानिएलास त्याच्या विश्वासाचे प्रमाण दर्शविण्यास पाचारण करण्यात आले होते.

दारयावेश (मेदी) राजा त्या काळात राज्य करीत होता आणि तो खरं तर दानिएलाचा मित्र होता. त्याने फर्मान सोडले की तीस दिवस पर्यंत राजाशिवाय कोणाही देवाची अथवा मानवाची आराधना जो कोणी करील तर त्यास सिंहाच्या गुहेत टाकण्यात येईल. दानिएलास नष्ट करावे म्हणून त्याच्या शत्रुनी मुद्दामहून घडविले होते.

हे आव्हान पेलतांना, कदाचित एखाद्याला वाटेल की दानिएलाने तीस दिवस पर्यंत त्याच्या देवाची आराधना करावयाचे थांबवावे किंवा कदाचित त्याने प्रार्थनेच्या वेळा लपविण्याचा प्रयत्न करावा. त्याने ह्याही पेक्षा प्रामुख्याने त्याच्या शत्रूपासून स्वत:ला वाचविण्यासाठी अधिक तीव्रतेने वा आर्ततेने गुप्त प्रार्थना करायला हवी होती असेही एखाद्याला वाटू शकते.

अर्थपूर्ण सत्यता ही आहे की दानिएलाने कोणतीही गोष्ट बदलली नाही. त्याने काहीही सुरू किंवा बंद केले नाही. तो ज्या प्रकारे दैनंदिन जीवन जगत होता. तसाच तो जगत राहिला. दानिएलाच्या विश्वासाप्रमाणे जगण्यासाठी देव आम्हा सर्वांना मदत करो.

○ ○ ○

# सत्याच्या वचनाला चांगल्या रितीने कामात आणणे

२ तिमथ्य २:१५

| जुना करार<br>आश्वासने दिली गेली<br>(उत्पत्ती ३:१५; १२:३) | नवीन करार<br>आश्वासने पूर्ण झालीत |
|---|---|
| १. राज्य स्थापित होते (दानियल २:४४) | मार्क ९:१, प्रे.कृ. १:८; २:१–४; लूक २२:२९,३०;१ करिंथ ११:२३ |
| २. परमेश्वराचे मंदिर स्थापण्यात येईल | इब्रि १०:१२<br>१ तिमथ्य ३:१५ |
| *“शेवटच्या दिवसांत असे होईल” यरुशलेमपासून आरंभ होऊन सर्व राष्ट्रातील लोक येतील.* | प्रे.कृ. २:१६,१७, इब्रि १:१,२<br>लूक २४:४६,४७; प्रे.कृ. १:४–८<br>प्रे.कृ. २:९; रोम १:१६ |
| ३. ख्रिस्त राजा होईल (यिर्मया २३:५,६) | मत्तय २८:१८;<br>प्रे.कृ. २:२९–३३ |
| ४. नवीन करारात बांधले जाणे (यिर्मया ३१:३१) | मत्तय १६:१८,१९;<br>प्रे.कृ. २:३६–३८, इब्रि९:१५–१७ |
| ५. पवित्र आत्म्याचा मनुष्यमात्रावर वर्षाव होतो (योएल २:२८) | प्रे.कृ. २:१६–२१ |

मंडळीसंबंधी केलेली सर्व आश्वासाने प्रेषितांची कृत्ये २ मध्ये पूर्ण झाली आहेत जो की एकच दिवस म्हणजेच ‘पॅटेकॉस्टच्या’ दिवसाविषयीचे वर्णन केले आहे.

| | |
|---|---|
| प्रेषितांची कृत्ये दुसऱ्या अध्यायाचे पहिले प्रत्येक वचनात राज्याच्या भविष्यात होण्याची गोष्ट केली आहे. (यशया २:२–४; दानि २:४४; मिखा ४:१,२; मत्तय ३:१,२; ६:९,१०; १६:१८; मार्क ९:१) | प्रेषितांची कृत्ये २ नंतर प्रत्येक वचनामध्ये राज्याचे अस्तित्वामध्ये असल्याबाबत गोष्ट केली आहे. (प्रे.कृ. २:४७; कलस्सै १:१३,१४) |